क्रमांक : लाप्रवि/अे–३/संगणक–प्रिंटर/वा.दे.करार/दरपत्रके/२०१८/ 3553
लाचलुचपत,प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई,वरळी पोलीस कॅम्प,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी,मुंबई – ४०० ०३०.
ANTI CORRUPTION BUREAU, M.S., MUMBAI, WORLI POLICE CAMP,
SIR POCHKHANWALA ROAD, WORLI, MUMBAI - 400 030.
Phone No. 24921212 (Ex.), Toll Free No.1064.
web site : www.acbmaharashtra.gov.in
Date - ११ / 04 /2018.

## -: सू च ना :-

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील खालीलप्रमाणे ५४ संगणक व २७ प्रिंटर्सचा दिनांक ०१.०५.२०१८ ते ३०.०४.२०१९ या कालावधीकरिता वार्षिक देखभाल करार करावयाचा आहे.

वार्षिक देखभाल करण्यास इच्छूक असणाऱ्या पुरवठादार कंपनीकडून कॉम्प्रीहेन्सिव्ह तसेच नॉन–कॉम्प्रीहेन्सिव्ह तत्वावरील दरपत्रके मागविण्यात येत आहेत. अशी दरपत्रके ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या आंत या कार्यालयास सादर करावीत. याबाबतच्या अटी व शर्तीचा सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१. सीलबंद दरपत्रके दिनांक १९.०४.२०१८ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये सायंकाळी १७.०० वा. पर्यंत कार्यालयात जमा करावी. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२. मोहोरबंद लिफाफ्यांवर ''संगणक व प्रिन्टर्स वार्षिक देखभाल दरपत्रके'' असे लिहिणे आवश्यक आहे. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.
३. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.
४. दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एक प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतो.
५. दरपत्रक कागदपत्रात कुंठेही खाडाखोड/ओव्हरराईटिंग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास त्यावर पूर्ण स्वाक्षरी करावी.
६. दरपत्रक धारक कंपनीने या कार्यालयातील खरेदी अधिकाऱ्यांबरोबर हितसंबध नसल्याबाबत आणि एकच निविदा दिल्याबाबतचे हमीपत्र दरपत्रकासोबत दयावे.
७. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रदद् करण्याचा अधिकार, हे कार्यालय राखून ठेवत आहे.
८. दरपत्रके दिनांक २०.०४.२०१८ शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वा. अपर पोलीस अधिक्षक (मुख्यालय) यांचे दालनात उघडण्यात येतील.
९. दरपत्रके स्वीकारण्याबाबतचा अंतिम निर्णय हया कार्यालयाचे विभाग प्रमुख यांचा राहील.
१०. दरपत्रक स्वीकृती तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध (Valid) राहील.

या कार्यालयास प्राप्त होणारी तीन किंवा त्यापेक्षा अधिक दरपत्रकांच्या तुलनात्मक किंमतीतील न्यूनतम दर असलेल्या कंपनीशी वार्षिक देखभाल करार करण्यात येईल, याची संबंधित कंपन्यांनी नोंद घ्यावी. तसेच आमंत्रणाच्या पत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अटींचे पालन करण्यात यावे.

( रा.रा.गायकवाड )
अपर पोलीस अधीक्षक (मुख्यालय),
महासंचालके, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
म.राज्य, मुंबई यांचेकरीता.

प्रति,
सर्व इच्छूक कंपन्या.